# १७ दुखणं बोटभर

**डॉ. चित्रा सोहनी–**(जन्म–१९५५) निवृत्त प्राध्यापिका व लेखिका. 'भाषा मुलांची', 'शैक्षणिक मानसशास्त्र', 'भाषिक कौशल्ये', 'अध्यापनाची प्रतिमाने' इत्यादी पुस्तकांचे लेखन. आकाशवाणीच्या शैक्षणिक कार्यक्रमात सहभाग. दूरदर्शनवरील शैक्षणिक कार्यक्रमांसाठी पटकथा लेखन. विविध नियतकालिकांतून शैक्षणिक लेखन.

'बोटभर' हा शब्द अगदी क्षुल्लक या अर्थी वापरला जातो; पण याच 'बोटभर' दुखण्याने लेखिका किती आणि कशा हैराण होतात, याचे मजेशीर वर्णन या पाठात आले आहे. बोट आणि हात या शरीराच्या अवयवांवर अनेक शब्दसमूह, वाक्प्रचार, शब्दांच्या छटा, गमती, शाब्दिक विनोद यांमुळे या पाठाला आलेली रंगत आनंद देऊन जाते.



(१) या मुलाची अवस्था अशी का झाली असेल? विचार करा. या मुलाची अशी अवस्था होण्यामागची कारणे सांगा. चर्चा करा.

(२) तुमच्या हाताला जखम झाली तर रोजची कामे तुम्ही कशी कराल?

बरेच दिवसांत कोणाची खुशाली कळली नसली, की 'बोटभर चिठ्ठीसुद्धा का नाही पाठवली!' असे म्हणतात. आमच्या वाड्यातल्या एक बाई, 'भावजयीनं 'मला बोटभर चिंधीसुद्धा नाही दिली हो', अशी तक्रार करायच्या. आता दहा हात साडीही नीट न पुरणाऱ्या बाई, बोटभर चिंधीचं काय करणार होत्या? असं आम्हांला वाटे.

सांगायचा मथितार्थ असा, की 'बोटभर' हा शब्द अगदी छोटंसं, क्षुल्लक अशा अर्थी वापरला जातो; पण माझ्या 'बोटभर' दुखण्यानं मला कसं हैराण केलं, त्याची ही 'हातभर' कहाणी आहे.

कुठलातरी कडक गूळ बत्त्यानं ठेचताना (आणि त्याबरोबर इकडच्या-तिकडच्या गप्पा करताना) एक घाव उजव्या हाताच्या बोटाच्या वर्मी बसला. तो घाव 'वर्मी' बसला याचं मर्मज्ञान उशिराच झालं. घाव बसताना वेदना होऊन मी बोट तोंडात घातलं; पण 'तू डावखोरी नसताना उजव्या हाताचं बोट कसं दुखावलं?' म्हणून इतरांनी आश्चर्यानं तोंडात बोटं घातली. नंतर बोटावर तीन महिने चाललेला खर्च, वेळ, वायफळ चर्चा यांमुळे दुखऱ्या बोटासकट हात कपाळाला लावायची वेळ माझ्यावर आली.



सुरुवातीला बोट ठसठसायला लागल्यावर मला एका जाहिरातीची आठवण झाली, 'मलम मलिए, काम पे चलिए'. मी बोटावर मलम लावले; पण कामासाठी ते मुळीसुद्धा नाही वळले. मी बोटाकडे दुर्लक्ष केल्याचा बेट्याला राग आला असणार, त्यामुळे ते मानी

माणसाप्रमाणे ताठलं. आता या बेट्या बोटाचा 'ताठा' कमी करावा, म्हणून बुडत्याला काडीचा आधार यानुसार मी वागायचं ठरवलं. अहो, म्हणजे गरम पाण्यानं शेकून पाहिलं होतं! पण छे! मोडेन पण वाकणार नाही, असा मराठी बाणा दाखवला त्यानं! शिवाय रागानं हुप्प होऊन फुगून बसलं. अन् हेऽऽ टम्म झालं बोट! त्याही स्थितीत जरा मस्का मारून पाहावा म्हणून तेलमालीश केलं; पण 'वो टस से मस नहीं हुआ ।'

शेवटी 'हा नाद सोड, डॉक्टरांचा फोन जोड' असा भाच्याचा उपदेश शिरोधार्य मानून मी डॉक्टरांना फोन केला. 'तपासल्याशिवाय कसं कळेल?' त्यांनी प्रश्न केला. मग दवाखाना गाठला. तिथे हीऽऽ गर्दी. कुणाचा पाय प्लास्टरमध्ये, कुणी कुबड्याधारी, कुणाचे हात गळ्यात (म्हणजे स्वत:चे हात स्वत:च्या गळ्यात) असल्या अलौकिक अवस्थेतले एकेक जण पाहिल्यावर पोटात गोळा आला. इथून पळ काढावा असं वाटत होतं. आमच्या त्या 'बाणेदार' बोटात आता असंख्य बाण घुसल्याच्या वेदना होत होत्या. त्यामुळे डॉक्टरांना भेटणं भागच होतं. हाडबिड तुटलं नसेल ना? अशी भीती वाटत होतीच.

मग त्या चिमुकल्या बोटाची नुसती तपासणी. क्ष किरणांनी फोटो वगैरे झाल्यावर डॉक्टरांनी हसत सांगितलं, 'काही नाही. घाबरू नका. प्लास्टरसुद्धा नकोय. नुसतं स्ट्रॅपिंग करायचंय.' डॉक्टरांच्या मिठ्ठास, बोलण्यामुळे मन अगदी हलकं झालं. मनावरचा ताण उतरला; पण थोड्याच वेळात भ्रमनिरास झाला. त्या स्ट्रॅपिंग नामक प्रकारात ते एकच बोट काय आजूबाजूची दोन बोटंही ताणून बांधून, वर हातही गळ्यात अडकवला. त्यामुळे जड हातानं आणि पर्स हलकी झाल्यामुळे जड अंत:करणानं घरी परतले.

आता शब्दश: हात बांधलेल्या अवस्थेत. त्यामुळे कामावर रजा टाकून घरी बसले. आपण उगाच 'डावउजवं' काही मानायला नको, असा सुज्ञ विचार करून डाव्या हातानं कामं सुरू केली; पण हा डावा हात कामाच्या बाबतीत अंमळ डावाच निघाला. विंचरणं, पकडणं, ढवळणं, शिवणं, लिहिणं काहीही नीट जमेना. शेवटी हात चोळत गप्प बसावं लागलं. कळ लागल्यामुळे आणि बोटं वळवायची नसल्यामुळे मी आपली नुसतीच कळवळायची. दिवसभरात पाच-सहा प्रकारच्या गोळ्याही घ्यायला दिल्या होत्या डॉक्टरांनी. आता पोटात गेलेल्या या गोळ्यांना बोट बरं करायचं की पोट हे कसं काय समजत असावं? अशी माझी बालपणापासूनची बाळबोध शंका आहे; पण ती विचारायचं धाडस होत नाही. त्यामुळे अवसान गोळा करून (कारण गोळ्यांच्या किमती पाहून ते गळालेलंच होतं) गोळ्या गिळंकृत केल्या.

बोटं नुसती घट्ट गुंडाळली होती, तरी 'रॅपिंग' असा सोपा शब्द सोडून 'स्ट्रॅपिंग' असा जड शब्द का वापरतात हे डॉक्टरच जाणे. स्ट्रॅपिंग निघाल्यावरही सगळं लगेच आलबेल झालं नाहीच. आणखी थोड्या गोळ्यांची फैर झडली आणि चेंडू वळण्याचा व्यायाम सांगितला. 'बच्चों का खेल', असं वाटून मी दुर्लक्ष केलं, तर पुढच्या भेटीत बोट न वळण्याचं कारण म्हणून या टाळलेल्या व्यायामावरच डॉक्टरांनी बोट ठेवलं. मग काय? चेंडू वळणं, कागदाचे घट्ट बोळे करणं असले व्यायाम सुरू. रजा संपून कामावर गेले; पण बोटामुळं कामाचा बट्ट्याबोळच!

हळूहळू हत्तीच्या पावलांनी आलेलं दुखणं मुंगीच्या पावलांनी बरं होऊ लागलं; पण अजूनही मी (कोणाच्याही नावानं) बोटं मोडू शकत नाही. राग आला तरी त्वेषानं घट्ट मूठ वळवू शकत नाही. बोट आपला हात दाखवत राहतंच. आपल्याकडे 'प्रभाते करदर्शनम्' करण्याची प्रथा का पडली असावी, हे समजून चुकलं आहे आणि आता बोटांचं महत्त्वही समजलं आहे.

**शिक्षकांसाठी :** या पाठातील कठीण शब्द व वाक्प्रचार यांची विद्यार्थ्यांकडून यादी करून घ्यावी. अकारविल्ह्यानुसार त्यांची मांडणी कशी करावी याविषयी मार्गदर्शन करावे. शब्दकोशाप्रमाणे त्यांची मांडणी करून घ्यावी.

## स्वाध्याय



**प्र. १. चार–पाच वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) लेखिकेच्या बोटाला दुखापत कशी झाली? दुखापत झाल्यावर लेखिकेने काय केले?

(आ) ठसठसणाऱ्या बोटाचं वर्णन लेखिकेने कसे केले आहे?

(इ) बोटाला लागल्यामुळे लेखिकेच्या कामावर काय परिणाम झाला?

**प्र. २. का ते लिहा.**

(अ) लेखिकेला कपाळाला हात लावण्याची वेळ आली.

(आ) लेखिका डॉक्टरांकडे जाण्यास तयार झाली.

(इ) दवाखान्यात गेल्यावर लेखिकेच्या पोटात गोळा आला.

(ई) दवाखान्यातून लेखिका जड अंतःकरणाने घरी परतली.

(उ) लेखिकेला आता बोटाचे महत्त्व समजले आहे.

**प्र. ३. तुमच्या वर्गमित्राला दुखापत झाली, तर तुम्ही त्याला कशी मदत कराल?**

**प्र. ४. पाठामध्ये बोटाला दुखापत होण्यापासून बोट बरे होईपर्यंत आलेल्या घटना क्रमवार लिहा.**

**प्र. ५. दुखापत झालेले बोट तुमच्याशी बोलते आहे अशी कल्पना करून दहा–बारा ओळी लिहा.**

**प्र. ६. तुम्हांला ठेच लागून जखम झाली तर.... काय कराल ते लिहा.**

### खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांचे पाठात आलेले समानार्थी शब्द लिहा.**

| | | |
|---|---|---|
| (अ) वहिनी – | (ई) ललाट – | (ए) नवल – |
| (आ) कथा – | (उ) त्रास – | (ऐ) तोरा – |
| (इ) आघात – | (ऊ) सकाळ – | (ओ) हात – |

**(आ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

| | |
|---|---|
| (अ) गरम x | (इ) घट्ट x |
| (आ) उजवा x | (ई) दुर्लक्ष x |

**(इ) वाक्यांत उपयोग करा.**

| | |
|---|---|
| (अ) वायफळ चर्चा – | (उ) बट्ट्याबोळ – |
| (आ) ठसठसणे – | (ऊ) हत्तीच्या पावलांनी येणे – |
| (इ) बाळबोध – | (ए) मुंगीच्या पावलांनी जाणे – |
| (ई) जड अंतःकरण – | (ऐ) जायबंदी – |

(ई) 'हा नाद सोड, डॉक्टरांचा फोन जोड' यासारखे यमक जुळवून खालील वाक्ये लिहा.

(अ) त्याचा खिसा गरम, -------

(आ) मोडेन पण वाकणार नाही, -------


(इ) बोटभर दुखणं, -------

(ई) मनावरचा उतरला ताण, -------

(उ) 'हाडबिड' यासारखे अवयवांवर आधारित जोडशब्द लिहा.

(ऊ) गप्प, हुप्प, टम्म यांसारखी जोडाक्षरे लिहा.

(ए) आकृतीत दिल्याप्रमाणे पुढे दिलेल्या शब्दांचे शेवटचे अक्षर सारखे असणारे शब्द लिहा.






(अ) मात्र (ई) गर्दी


(आ) बत्ता (उ) साडी

(इ) पळ

(ऐ) 'बोट' याप्रमाणे 'हात' व 'पोट' यांवर आधारित वाक्प्रचार व म्हणी लिहा.





(ओ) हात व हस्त हे एकाच अर्थाचे शब्द आहेत. खालील शब्दांत हात व हस्त लपलेले आहेत. ते शब्द वाचा व त्यांचे अर्थ समजून घ्या.

हातोडा, हातकंकण, हातकडी, हस्तक्षेप, हस्तकला, हातमोजे, हस्तरेषा, हस्ताक्षर, हातखंडा, हस्तलिखित, हस्तांदोलन, हस्तगत.

**शोध घेऊया.**

(अ) या पाठातील विनोदी वाक्ये शोधून लिहा.

(आ) पाठातील बोट या शब्दासाठी आलेली विशेषणे खालील आकृतीत लिहा.




(इ) हत्तीच्या पावलांनी येणे, मुंगीच्या पावलांनी जाणे यांसारख्या म्हणी शोधा.

- पुढील वाक्यांतील क्रियापदे सकर्मक की अकर्मक ते ओळखा व रिकाम्या जागेत लिहा.

(१) आई भाकरी करते. ______ (४) अनुराधा पत्र लिहिते. ______

(२) गणेश रस्त्यात पडला. ______ (५) सुरेखाचे डोके दुखते. ______

(३) उद्या दिवाळी आहे. ______ (६) गाई झाडाखाली बसल्या. ______

- खालील वाक्ये वाचा व अधोरेखित शब्दांचे निरीक्षण करा.

(१) क्रीडांगणावर मुले खेळू लागली.

(२) मीना पुस्तक वाचत आहे.

(३) सरिताने सर्व अभ्यास करून आणला.

वरील वाक्यांमध्ये एकाच वाक्यात दोन क्रिया दिसतात. त्यांतील एक क्रिया वगळली तर वाक्य पूर्ण होत नाही. वाक्याचा अर्थ पूर्ण कळत नाही. इतकेच नाही तर काळही कळत नाही, म्हणून वाक्यांमध्ये क्रिया कळण्यासाठी दोन क्रियादर्शक शब्द वापरावे लागतात, म्हणजेच जोड क्रियापद वापरावे लागते. अशी जोड क्रियापदे म्हणजे 'संयुक्त क्रियापदे' होय.

वाक्यातील क्रिया दाखवणाऱ्या क्रियापदाच्या मूळ रूपापासून तयार झालेले खेळू हे धातुसाधित (कृदन्त) आहे, तर 'खेळ' ही मूळ क्रिया किंवा धातू आहे.

| अ.क्र. | मूळ धातू | धातुसाधित | संयुक्त क्रियापद |
|---|---|---|---|
| १. | खेळ | खेळू | खेळू लागला. |
| २. | वाच | वाचू | वाचू लागला. |
| ३. | कर | करून | करून आणला. |